Order Below Exh.1

1. Applicants present. Heard Advocate for applicants. Perused application and the documents filed along-with it.
2. The application Prima facie discloses that, the applicant was subjected to Domestic Violence by the non applicants.
3. Issue notice to the non applicants through protection officer returnable on 11/04/2026.
4. The Domestic Incident report be called from the Protection officer on or before 11/04/2026.

म.कौ.हिं.सं.का अर्ज नं......./२०२६

PWDVA NO 49-2026
EXH.1

दै रजि नं.

दाखला ता.

## मा.मुख्य न्यायदंडाधिकारी सो, कोल्हापूर यांचे कोर्टात....

Digitally signed by PANKAJ BHAGATSING RAJPUT
Date: 2026.03.16 17:34:42 +0530



१) अर्जदाराचे नांवः— सौ.ज्योती दिपक ताकतोडे,
वय वर्षे २९, व्यवसाय—गृहिणी,
रा.राजेंद्रनगर, मोरेवाडी रोड, कोल्हापूर
} अर्जदार

विं.प.चे नांव

१) श्री.दिपक प्रभाकर ताकतोडे, (पती)
वय वर्षे ३८, व्यवसाय—गवंडी काम,
रा.नवीन वसाहत, राजेंद्रनगर, डॉ.बाबासाहेब
आंबेडकर हॉल शेजारी, कोल्हापूर

२) श्रीमती रेखा प्रभाकर ताकतोडे,
वय वर्षे ६०, व्यवसाय—गृहिणी,
रा. रा.नवीन वसाहत, राजेंद्रनगर, डॉ.बाबासाहेब
आंबेडकर हॉल शेजारी, कोल्हापूर
} विरोधी पक्ष

J. D. takatode
सौ ज्योति दिपक ताकतोडे

**<u>कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनयम २००५ चे कलम १२ प्रमाणे अर्ज स्थळसिमेकरीता राजारामपूरी पोलीस ठाणे.</u>**

यातील अर्जदार यांची मे.न्यायालयास कळविणे खालीलप्रमाणे:–

अर्जदार यांचा विवाह दिपक प्रभाकर ताकतोड, रा. आंबेडकर हॉल जवळ, साळोखेनगर, नवीन वसाहत, सर्वपल्ली राधाकृष्ण विद्यामंदिर शेजारी, राजेंद्रनगर, कोल्हापूर यांचेशी बौध्दरितीरिवाजाप्रमाणे लग्न जवाहरनगर येथे दि.२३/०४/२०१४ रोजी झाला आहे. सदर विवाहसंबंधातून आम्हास दोन मुली आहे. कु.आरती ९ वर्ष व कु.आरवी ६ वर्षे अशी दोन मुली अपत्ये आहेत.

लग्न झालेपासूनच अर्जदारास पती, सासू हे अर्जदारास किरकोळ कारणावरून तसेच घरातील कामावरून शिवीगाळी करणे व तसेच प्रसंगी बेदम मारहाण करून माझा मानसिक व शारिरीक छळ केलेला आहे.

तसेच अर्जदारास दोन्ही मुलीच झाल्या म्हणून अर्जदाराला पती व सासू यांनी शिवीगाळी व मारहाण करून माझा मानसिक व शारिरीक छळ केलेला आहे.

पतीला दारूचे व्यसन असल्याने पती रोज दारू पिवून येवून अर्जदार कोणत्याही कारणावरून शिवीगाळी व मारहाण करणे असे प्रकार



J.D. takhtode
सौ ज्योति दिपक ताकतोडे

करत होता. तसेच पती घरखर्चाला पैसे देत नव्हता तसेच अर्जदारास व दोन्ही मुलींचे पालनपोषण औषधउपचार, कपडालत्ता यासाठी सुध्दा पैसे देत नव्हता.

म्हणून अर्जदाराने नोकरी करण्याचे ठरविले पण पती अर्जदारास मी नोकरी सोडविण्यासाठी सांगत आहे. अर्जदारास घरी बस असे म्हणत आहे. नाहीतर मला सोडचिठ्ठी दे असे म्हणत असे.

गेले सहा महिन्यापुर्वी अर्जदारास पतीने दारू पिवून येवून तु नोकरी सोड तसेच अर्जदारास घटस्फोट दे असे म्हणून रात्री १२.३० वा. भांडणे काढून अर्जदारास शिवीगाळी करत मारहाण केली.त्यानंतर अर्जदार व दोन्ही मुलींसह घराबाहेर काढले. तेव्हापासून अर्जदार हे माझे माहेरी रहात आहे. अर्जदाराची आई धुण्याभांडयाची कामे करून अर्जदारास व अर्जदाराच्या दोन्ही मुलीचा उदरनिर्वाह करत आहे. माझे वडिलांचे निधन झाले आहे. माझी माहेरची आर्थिक परिस्थिती हालाखीची आहे.

अर्जदार हे चांगली वागत व नांदत असतापैकी फक्त दोन मुलीच झाल्या व मी नोकरी करते या कारणावरून पती व सासू हे अर्जदारास नांदवत नाहीत.

त्यानंतर अर्जदाराने दि.०४/०९/२०२५ रोजी मा.जिल्हा समुपदेशन, जिल्हा समुपदेशन केंद्र, महिला सहाय्यक कक्ष, पोलीस



J. D. Taktode
ज्योति दिपक ताकतोडे

अधिक्षक कार्यालय, कोल्हापूर येथे अर्जदाराने पती व सासू यांचेविरूध्द तक्रार अर्ज केला होता. त्याअनुषंगाने अर्जदार, पती व सासू यांचे समुपदेशन करून अर्जदारांना पुन्हा नांदणेस पाठविले. पण अर्जदार हया दोन महिने नांदल्या त्यातील आठ पती व सासू यांनी त्यांना चांगली वागणूक दिली. पण त्यानंतर पुन्हा पती व सासू यांनी पुर्वीप्रमाणे त्यांना मानसिक व शारिरीक छळ केला तसेच पतीने आपल्या दोन्ही मुलींना सुध्दा मारहाण केली.

अर्जदारांना दि. २६ जानेवारी २०२६ मध्ये अर्जदारांना पती व सासू यांनी पतीने मोबाईल फेकून आपल्या लहान मुलीला मारला व यामध्ये अर्जदार व पती यांच्यामध्ये भांडणतंटा झाला त्यावेळी सासू मध्ये येवून त्यांनी अर्जदाराला शिवीगाळी करत मारहाण केली व रात्री ११.३०वा. सुमारास घराबाहेर काढले. सदर बाबत अर्जदार हिने राजारामपूरी पो.ठाणे, कोल्हापूर येथे पती व सासू विरूध्द फिर्याद देणेस गेले असता पती व सासू यांना बोलावून घेतले पण त्यांनी पोलीसांना सुध्दा सहकार्य केले नाही किंवा अर्जदारास नांदविणार नाही असे बोलून निघून गेल्या.

सबब, मे. कोर्टास विनंती की,

अ. अर्जदार यांना लग्नात अर्जदाराच्या वडिलांनी घातलेले सर्व सोने दागिने हे अर्जदारांना वि.प. यांच्याकडून परत मिळावेत.



J. D. takhode
सौ ज्योति दिपक ताकतोडे

ब. अर्जदाराच्या आईना जो कांही लग्नासाठी खर्च रू.३ लाख झाला आहे तो सर्व खर्च वि प. यांच्याकडून परत मिळावेत.

क. अर्जदार यांच्या दैनदिन गरजांसाठी निर्वाहाचा आदेश द्यावेत.

ड. अर्जदार यांना शारिरीक व मानसिक नुकसानीची नुकसान भरपाई मंजूर व्हावी.

इ. तसेच अर्जदारांचे पतींचे एक राजेंद्रनगर, कोल्हापूर येथे घर आहे. तर दुसरे साळोंखे पार्क, कोल्हापूर येथे घर आहे. या दोन्हीपैकी एक कायदेशीररित्या कोणतीही बाब नसलेले एक घर दोन्ही मुलींच्या नांवे करावेत.

ई. जरूर तर अर्ज दुरूस्तीस परवानगी असावी.

फ. न्यायाचे योग्य ते आदेश अर्जदार यांचे बाजूने व्हावेत.

अर्जदार ह्या तात्पुरत्या स्वरूपाची खाजगी नोकरी असल्याने त्यांच्याकडे उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही. तुटपुंज्या उत्पन्नत दोन्ही मुलींचा उदरनिर्वाह करून शकत नाहीत. अर्जदार विनंती करते की, आपण अर्जदार यांच्या अर्जावर त्वरीत कारवाई करून योग्य तो न्याय मिळवून द्यावा, अर्जदार आपल्याकडे मदतीची आशा बाळगून आहे.

कोल्हापूर
दि.23/०२/२०२६

J. D. Taktode
अर्जदार
सौ.ज्योती दिपक ताकतोडे



J. D. Taktode
सौ ज्योती दिपक ताकतोडे